महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

- **फुटाळा दर्शक दिर्घेचे काम वेगाने सुरु**

केंद्रीय रस्ते निधी (सेन्ट्रल रोड फंड – सीआरएफ) अंतर्गत होऊ घातलेल्या फुटाळा प्रकल्पाचे काम वेगाने सुरु आहे. या प्रकल्पावर एकूण ११३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

या प्रकल्पाचे एकूण चार भाग असून ते खालील प्रमाणे आहे:

१. दर्शक दिर्घेसह प्रोजेक्टर कक्ष

२. बहुमजली वाहन तळ

३. सिमेंट काँक्रीट रस्ता

- **दर्शक दिर्घेसह प्रोजेक्टर कक्ष** : दर्शक दिर्घेची एकूण लांबी ३५० मीटर असून आसन क्षमता ४,००० आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) फुटाळा तलावात मल्टी मीडिया लेझर शो देखील तयार करते आहे. दर्शक दिर्घेत बसून हा लेझर शो बघता येईल. दर्शक दिर्घेच्या बाजूला प्रोजेक्टर कक्ष बांधण्याचे काम देखील सुरु आहे. एकूण ३५० मीटर लांब असलेल्या दीर्घा टेंसाईल रूफ टॉपच्या माध्यमाने झाकलेली असेल. दर्शक दिर्घे जवळ वाहन ठेवण्याची सोय असेल ज्यात १३ कार, २४ दुचाकी आणि २४ सायकल पार्किंगची सोय असेल.

- **बहुमजली वाहन तळ** : या प्रकल्पाअंतर्गत बहूमजली वाहन तळ देखील प्रस्तावित असून लेझर शो बघण्य करता आलेले दर्शक आपली वाहने इथे ठेऊ शकतात. येथील पार्किंग व्यवस्थेचे स्वयंचलीत असेल. येथे १,००० कार तसेच ३०५ दुचाकी वाहनांकरता पार्किंगची सोय असेल.

- **सिमेंट काँक्रीट रोड :**फुटाळा लगत असलेल्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटचे काम पूर्णत्वास आले असून या रस्त्याची लांबी एकूण २.८६ किलोमीटर तर रुंदी १८ मीटर आहे. दर्शक दिर्घेच्या मागे हा रस्ता आहे.

नागपूर हेरिटेज समितीने या प्रकल्पाचा आढावा १५ जून रोजी घेतला आणि कुठलाही आक्षेप यावर घेतला नाही.

या आधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूचनेप्रमाणे दर्शक दिर्घेच्या खाली बोगदा बांधण्याचे नियोजन होते. पण जानेवारी २०१९ मध्ये हा प्रस्ताव बदलला होता आणि ऑक्टोबर २०१९ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याने मंजूर केलेल्या अंतिम प्लॅन मध्ये बोगद्याचा समावेश नव्हता. मल्टी मीडिया लेझर शो प्रकल्पाकरता नागपूर सुधार प्रन्यासने नेमलेल्या सल्लागारांनी या ध्वनी लहरींचा बोगद्याच्या भिंतीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली होती. म्हणून महा मेट्रोने या संबंधी नवीन प्लान तयार केला.